# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




**परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1055
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 19 JUL 2022

## परिपत्रक – ५५

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, विद्यापीठ संकुलातील संचालक / परीक्षा केंद्राचे संचालक /अंतर्गत व बहि:स्थ पर्यवेक्षक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल -२०२२ च्या परीक्षा सद्यस्थितीत विविध परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे व व्यवस्थितपणे सुरु आहेत. परंतू काही परीक्षा केंदाकडून विद्यापीठाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांचे अवलोकन करुन तंतोतत पालन केले जात नसल्याचे दिसून आले आहे.

या परिपत्रकाअन्वये पुनश्च: एकदा आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या परीक्षावरील परीक्षा या निकोप, कॉपीविरहीत व सुरळीपणे पार पाडल्या जाव्यात यासाठी खालील सूचनांचे पालन करावे.

१. मार्च / एप्रिल २०२२ च्या परीक्षांसाठी विद्यापीठाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व परिपत्रकांचे बारकाईने अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.
२. परीक्षा हॉलमध्ये एखादा विद्यार्थी जवळच्या विद्यार्थ्यांचे OMR Sheet पाहून नक्कल करुन त्या विद्यार्थ्यांप्रमाणे Bubble एकसारखे गोल केले असल्यास सामुहिक कॉपी ग्राह्य धरली जाणार आहे.
३. परीक्षा केंद्रावरील एका परीक्षा कक्षामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी एकसमान सर्व प्रश्नांसाठी OMR Bubble गोल केले असल्यास तो संपूर्ण परीक्षा कक्ष सामुहिक नक्कल असे समजण्यात येऊन संबंधित वर्गावरील पर्यवेक्षक व विद्यार्थ्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
४. परीक्षा केंद्रावरील परीक्षा कक्षामध्ये एक विद्यार्थी अथवा सर्व विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेच्या पर्यायावर टिकमार्क करुन त्याप्रमाणे OMR Bubble गोल करीत असेल तर ती ही बाब वैयक्तीक अथवा सामुहिक नक्कल म्हणून ग्राह्य धरुन संबंधित वर्गावरील पर्यवेक्षक व विद्यार्थ्यांवर नियमानुसार कार्यवाही केली जाईल.
५. परीक्षा केंद्रावरील परीक्षेसाठी विद्यापीठाने नेमून दिलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भरारी पथकाच्या कार्यवाहीमध्ये आवश्यकतेनुसार सर्वांनी सहकार्य करावे, याबाबतीत टाळाटाळ करु नये.
६. परीक्षा केंद्रानी त्यांच्या परीक्षा केंद्रावरील विद्यार्थीनिहाय ब्लॉकची माहिती, दिशादर्शक सूची दर्शनी भागात लावणे अनिवार्य व बंधनकारक आहे.
७. सर्व परीक्षा केंद्रानी विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार रफ वर्कसाठी परीक्षा केंद्राचा शिक्का असलेले एक कोरे पेज विद्यार्थ्यांना देण्यात यावे. त्यावर विद्यार्थ्यांनी Seat Number लिहून केवळ रफ वर्कसाठी मात्र वापरावे. शेवटी हा रफ कागद OMR Sheet बरोबर वर्गातील पर्यवेक्षकाकडे जमा करावा.
८. परीक्षा केंद्रावरील वर्गात पर्यवेक्षण करणाऱ्या पर्यवेक्षकांनी (Jr. Supervisor) मोबाईल घेऊन वर्गात जाऊ नये. पर्यवेक्षण करताना मोबाईल जवळ बाळगू नये.
९. परीक्षा केंद्रावरील सर्व ब्लॉकमध्ये सामूहिक नक्कल होत आहे असे भरारी पथकास निदर्शनास आल्यास भरारी पथकांनी त्यांचा निरीक्षणाचा पूर्ण अहवाल विद्यापीठास सादर करावा. अशा संदर्भात विद्यापीठांनी परीक्षा केंद्रावरील सर्व अधिकारी, वर्गातील पर्यवेक्षक (Jr. Supervisor) व परीक्षा कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४८ मधील ४ व ५ नुसार कार्यवाही केली जाईल, याची संबंधीतानी नोंद घ्यावी.

सबब, हे परिपत्रक मार्च / एप्रिल २०२२ परीक्षा सुरळीतपणे व निकोप पार पाडण्याकरीता निर्गमित होत असून याचे सर्व परीक्षा केंद्रांनी तंतोतंत पालन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ. शिवकुमार एस. गणपूर)
**मा.संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ